नाशिक
दि. २४/११/२०२१

<u>प्रेसनोट</u>

**आलोसे क्र.१) कैलास आनंदा सोनवणे. पोलीस उप निरीक्षक व आलोसे क्र.२) दिपक बाळकृष्ण वाणी, पोलीस शिपाई ब.नं.२०९० दोन्ही नेमणुक अंबड पोलीस स्टेशन नाशिक शहर यांना १०,०००/— रूपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत.**

| | |
|---|---|
| घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | कार्यवाही सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कायदा कलम ७ प्रमाणे |
| आरोपींचे नांव व कार्यालय | .१) कैलास आनंदा सोनवणे. पोलीस उप निरीक्षक<br>२) दिपक बाळकृष्ण वाणी, पोलीस शिपाई ब.नं.२०९०<br>दोन्ही नेमणुक अंबड पोलीस स्टेशन नाशिक शहर |
| मागणी कलेली लाचेची रक्कम | १५,०००/— रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १०,०००/— रूपये (तडजोडी अंती) |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांच्याविरुध्द अंबड पोलीस स्टेशन नाशिक शहर येथे गु.र.नं.३८८/२०२१ भा.दं.वि.कलम ३५३, १४३ वैगरे प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयात तक्रारदार यांना मा.नाशिक न्यायालयाने अंतरिम जामीन मंजुर केला असून **आलोसे क्र.१)** कैलास आनंदा सोनवणे. पोलीस उप निरीक्षक व **आलोसे क्र.२)** दिपक बाळकृष्ण वाणी, पोलीस शिपाई ब.नं.२०९० दोन्ही नेमणुक अंबड पोलीस स्टेशन नाशिक शहर यांनी तक्रारदार यांना पोलीस स्टेशन येथे जामीनीची प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे १५,०००/—रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने सापळापुर्व पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता **आलोसे क्र.१)** कैलास आनंदा सोनवणे. पोलीस उप निरीक्षक व **आलोसे क्र.२)** दिपक बाळकृष्ण वाणी, पोलीस शिपाई ब.नं.२०९० दोन्ही नेमणुक अंबड पोलीस स्टेशन नाशिक शहर यांनी तक्रारदार यांचेकडून १५,०००/— रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती १०,०००/— रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम **आलोसे क्र.२)** दिपक बाळकृष्ण वाणी, पोलीस शिपाई ब.नं.२०९० नेमणुक अंबड पोलीस स्टेशन नाशिक शहर यांनी दि.२३/११/२०२१रोजी पंच व साक्षीदारांसमक्ष अंबड पोलीस स्टेशनचे आवारात स्विकारल्याने दि.२४/११/२०२१ रोजी दोघांनाही ताब्यात घेऊन त्यांचेवर भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन—१९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची पुढील कार्यवाही चालु आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक कार्यालयात संपर्क करावा.

संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक कार्यालय

संकेतस्थळ : acbmaharashtra.gov.in

ई—मेल : spacbnasik@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार/ॲप्लीकेशन : acbmaharastra.net
टोल फ्री क्र. : १०६४
दुरध्वनी क्र. : ०२५३—२५७५६२८, २५७८२३०
व्हॉटस ॲप क्र. : ९९३०९९७७००

**( सतिश भामरे )**
वाचक पोलीस उपअधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक